October-November-December-2021 E-ISSN – 2348-7143

International Research Fellows Association's


# RESEARCH JOURNEY

International E-Research Journal

Peer Reviewed, Referred & Indexed Journal

Vol.-8, Issue-4

## Recent Trends in Research




Chief Editor -
Dr. Dhanraj T. Dhangar,
Assist. Prof. (Marathi)
MGV's Arts & Commerce College,
Yeola, Dist – Nashik [M.S.] INDIA

Executive Editors :
Dr. Tejesh Beldar, Nashikroad (English)
Dr. Gajanan Wankhede, Kinwat (Hindi)
Mrs. Bharati Sonawane, Bhusawal (Marathi)
Dr. Rajay Pawar, Goa (Konkani)

RESEARCH JOURNEY

For Details Visit To : www.researchjourney.net

SWATIDHAN PUBLICATIONS

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION

Scanned with OKEN Scanner

## INDEX


| No. | Title of the Paper | Author's Name | Page No. |
|---|---|---|---|
| | **English Section** | | |
| 1 | The Use of Symbols and Imagery in Rabindranath Tagor's Selected Short Stories | Dr. Abdul Anees Abdul Rasheed, Mrs. Kavita Kakhandki | 06 |
| 2 | Rethinking Multiculturalism : An Overview | Dr. T. M. Inamdar | 11 |
| 3 | A Study of Ambivalence in Aravind Adiga's '*Selection Day*' | Dr. N.Gunasekaran, Mrs. K.S. Shyalaja | 14 |
| 4 | Power and Solidarity in Literary Discourse | Dr. Prabhakar Hapse | 17 |
| 5 | The Myth of *Yavakri* in Girish Karnad's '*The Fire and the Rain*' | Dr. Sandeep Wagh | 20 |
| 6 | Intertextuality in Jean Rhy's '*Wide Sargasso Sea*' | Dr. Mahadev Waghmode | 23 |
| 7 | Gender Inequality in Nayantara Sahgal's '*Storm in Chandigarh*' | Dr. N. Gunasekaran, R. Santhi | 26 |
| 8 | The Role of India Tourism Development Corporation (ITDC) | Dr. Mahendra Agale | 31 |
| 9 | Rain Water Harvesting and Watershed Management of Dhora Basin in Ahmednagar District | Prof. Baban Avhad, Dr. R. D. Davankar | 35 |
| 10 | Studies on Antifungal Properties of Freshwater Fish Skin Mucus | D. K. Hiwarale | 41 |
| 11 | Impact of Covid-19 on Agriculture Sector : Study of Ahmednagar District | Dr. Maruti Kekane | 45 |
| 12 | State Wise Imbalances in the Growth of Area and Production of Sugarcane Crops in India | Dr. B. S. Salunkhe | 49 |
| 13 | A Study of the Care of Reading Materials in Ratnagiri District College Libraries | Dr. Rajesh Rajam | 52 |
| 14 | Library Automation in City College Libraries of Jalgaon, Dhule and Nandurbar | Ratneshwar Bhavsar, Dr. Anil Chikate | 59 |
| 15 | A Critical Study of Performance Management in Union Bank of India, Nagpur | Dr. Sameer Kuduple | 70 |
| 16 | Pandit Nehru Pancheel, Peaceful & 21 Centure World | Dr. Pramod Sardar | 81 |
| 17 | The Impact of' Non-Verbal Communication in the Class | Dr. Balasaheb Yadav | 83 |
| 18 | A Study of Self-Confidence among Tribals and Non-Tribals College Students | Dr. J. P. Sontakke, Mr. Samadhan Patil | 89 |
| 19 | Visual Representation of the Ideal Method of Teaching in Marathi Movie 'Ubuntu' | Mr. Vaibhao Waghmare | 95 |
| 20 | Studies of Microbial Fauna on Fish Skin Mucus of Channa Punctatus (Murrel) | D. K. Hiwarale | 97 |
| 21 | Scenario of Rural Household Distribution and Household Size in Dhule District | Mr. Chaitanya Nikam, Dr. Jaydev, Dr .S. B. Patil | 102 |
| | **हिंदी विभाग** | | |
| 22 | भारतीय आचार्यों द्वारा प्रस्तुत काव्य लक्षण | डॉ. मधुकर राठोड़ | 108 |
| 23 | 'शकुंतला' महाकाव्य में अभिव्यंजित 'भारतीय संस्कृति' | डॉ.विश्वनाथ महादू देशमुख | 113 |
| 24 | 'मंगल भवन'उपन्यास में ग्राम जीवन का चित्रण | प्रो. देविदास बामणे | 118 |
| 25 | मैत्रेयी पुष्पा के उपन्यासों में चित्रित नारी चितन | डॉ. डी. बी. महाजन | 126 |




Scanned with OKEN Scanner

| | | | |
|---|---|---|---|
| 54 | ग्रामीण विकासात सहकारी क्षेत्राची भूमिका | डॉ. गोरखनाथ वाकळे | 283 |
| 55 | लाखनी तालुक्यातील मातीच्या विटा बनविणाऱ्या (मजुरांचा) कामगारांचा अभ्यास | डॉ. सुरेश बन्सपाल | 288 |
| 56 | कोविड-१९ आणि भारतीय कृषीक्षेत्र : स्वरूप व नियोजन | डॉ. विवेक चौधरी | 292 |
| 57 | डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे शैक्षणिक विचार व कार्य | डॉ. राजेंद्र रासकर | 296 |
| 58 | प्राचीन भारतातील शिक्षण व्यवस्था | प्रा. आर. के. सूर्यवंशी | 300 |
| 59 | भारताचे परराष्ट्र धोरण आणि भारत व अमेरिका संबंध | डॉ. विमल राठोड | 303 |
| 60 | नैनिकी आणि शहरी शाळेतील विद्यार्थ्यांमध्ये मनमोकळा, उत्तेजीतपणा, मनमौजी आणि कर्तव्यदक्षता या व्यक्तिमत्व घटकांचा अभ्यास | डॉ. दिनेश ढेंगळे | 309 |
| 61 | महाडच्या सत्याग्रहाचे लिंगभावात्मक आकलन | प्रा. किशोर काजळे | 313 |
| 62 | तबकडी भूविवर्तनिकी सिद्धांताचा विषय संप्रेषणात्मक अभ्यास | डॉ. एम. पी. पगार | 318 |
| 63 | ग्रंथालयांच्या आर्थिक व्यवस्थापन आणि मनुष्यबळ विकासाच्या समस्या | प्रा. प्रज्ञा देवरे | 322 |
| 64 | मध्ययुगीन सरकार गाळणा : एक दृष्टिक्षेप | प्रा. जितेंद्र पगार | 326 |
| 65 | गडचिरोली जिल्ह्यातील भामरागड तालुक्यातील माडिया गोंड जमातीच्या राजकीय सहभागाचे अध्ययन | डॉ. गणेश खुणे | 332 |
| 66 | 'महाराष्ट्राची परंपरा' : एक वाङ्मयीन मूल्यमापन | डॉ. राजेश्वर दुडूकनाळे | 336 |


## उर्दू विभाग


| | | | |
|---|---|---|---|
| 67 | محب کوثر: بحیثیت نثر نگار بندوستان میں جدید غزل گوئی ایک سرسری جائزہ | Dr. Abdur Rahim. A Mulla | 341 |
| 68 | منشی پریم چند کا افسا نہ "کفن" کی حقیقت نگا ری پر تبصرہ- | ڈاکٹر سیّد تا ج ا لہدا محمد یو سف خطیب ، بیلگا وی - | 344 |


*Our Editors have reviewed papers with experts' committee, and they have checked the papers on their level best to stop furtive literature. Except it, the respective authors of the papers are responsible for originality of the papers and intensive thoughts in the papers. Nobody can republish these papers without pre-permission of the publisher.*

***- Chief & Executive Editor***



Scanned with OKEN Scanner

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Vol. 8, Issue 4 : Multidisciplinary Issue
Peer Reviewed Journal
E-ISSN : 2348-7143
Oct-Dec 2021

# ग्रंथालयांच्या आर्थिक व्यवस्थापन आणि मनुष्यबळ विकासाच्या समस्या

**प्रा. प्रज्ञा देवरे**
ग्रंथपाल,
महिलारत्न पुष्पाताई हिरे महिला महाविद्यालय,
मालेगांव कॅम्प, जि.नाशिक
ई मेल :- deorepradnya.pd.pd@gmail.com
मो.नं. ९४२०९०१७१९

**सारांश :-**

महाविद्यालयीन ग्रंथालयांपुढे आर्थिक व्यवस्थापन त्याचप्रमाणे मनुष्यबळ विकास समस्या बिकट स्वरुपात आहेत. अनुदानित महाविद्यालयांना यु.जी.सी. कडून मिळणारे तोकडे अनुदान तर खाजगी विनाअनुदानित महाविद्यालयांना स्वतंत्र स्त्रोतांवर अवलंबुन राहावे लागते. प्रगत माहिती तंत्रज्ञानाचा वापर करुन या दोन्ही समस्यांवर महाविद्यालये मात करु शकतात. अन्वेषणात्मक पध्दतीने यातील कार्यकारण भावाचा संबंध शोधणे आवश्यक वाटते. या समस्या शोधतांना त्यामागे काही कारणे असल्यामुळे या प्रक्रियेत कार्यकारण भाव शोधणे हे अगत्याचे ठरते.

संपूर्ण महाराष्ट्रात २०११ च्या अहवालानुसार ४६३१ महाविद्यालये असून २०२१ अखेर ती संख्या पाच हजाराच्या पुढे गेली आहे. उच्च शिक्षणाच्या बाबतीत महाराष्ट्र राज्य हे देशात आघाडीवर आहे. येथील प्रत्येक महाविद्यालयात विद्यार्थी केंद्रबिंदू धरुन ग्रंथालयांची रचना करण्यात आली आहे. ही ग्रंथालये दोन प्रकारची आहेत. अनुदानित महाविद्यालये व विनाअनुदानित खाजगी महाविद्यालये या दोन्ही प्रकारांत ग्रंथालय हा एक आवश्यक घटक आहे. अनुदानित महाविद्यालयांना विद्यापीठ अनुदान मंडळाकडून ग्रंथालयांना अनुदान प्राप्त होते, परंतु विनाअनुदानित खाजगी महाविद्यालये ही ग्रंथालयाचा स्वत:च्या बळावर साधनसामुग्रीचा विकास करतात. या दोन्ही प्रकारच्या ग्रंथालयांपुढे आर्थिक व्यवस्थापन आणि मनुष्यबळ विकासाच्या समस्या प्राधान्याने असतात. त्यांच्या समस्यांचा विचार व अभ्यास होणे त्यांच्या विकासाच्या दृष्टीने आवश्यक आहे असे वाटते.

जागतिकीकरणानंतर अर्थशास्त्राची भाषा बदलली आहे. फ्रेजर या अर्थशास्त्रज्ञाच्या मते नव्या युगात जागतिकीकरणानंतर वेळेची उपयोगिता, जागेची उपयोगिता आणि किंमत उपयोगिता या नव्या कल्पनांचा उदय झाला आहे. त्यामुळे ग्रंथालय शास्त्रात झपाटयाने बदल होत आहे. तेथे वेळेला महत्व आले आहे. कमी जागेत अधिक सेवा, अधिक माहिती सेवा द्यावी लागत आहे. तसेच अल्प किंमतीत पुस्तके खरेदी करुन ते वाचकांना द्यावी लागत आहेत.

अनंत गरजा आणि मर्यादीत साधने यामध्ये मेळ घालण्यासाठी अर्थशास्त्र या विषयात मीमांसा केली जाते आहे असे मार्शल यांनी म्हटले आहे. त्यानुसार ग्रंथालयातील सेवासुविधांचा पर्याप्त व अधिक चांगला उपयोग कसा करता येईल यासाठी विचार केला जात आहे. जागतिकीकरणानंतर गॅटस् करारामुळे शिक्षणाचा समावेश सेवा क्षेत्रात करण्यात आला आहे. त्यामुळे ग्रंथालयांच्या सेवा लाभार्थी पर्यंत कशा चांगल्या प्रकारे पोहचविता येतील त्याबाबत अर्थशास्त्राच्या दृष्टीने देखील अभ्यास करणे आवश्यक वाटते.

पिटर ड्रकर या नामवंत व्यवस्थापन शास्त्रज्ञाने एकविसाव्या शतकातील व्यवस्थापन म्हणजे अज्ञानाचे निर्मूलन करण्यासाठी ज्ञानाचे व्यवस्थापन करणे होय असे म्हटले आहे. त्यानुसार ज्ञानव्यवस्थापनाच्या नव्या संकल्पनांच्या आधारे ग्रंथालयाचे व्यवस्थापन केले जात आहे. सॅम पिट्रोदा यांनी ज्ञान आयोगात ग्रंथालयांना नॉलेज रिसोर्स सेंटर म्हणजे ज्ञान सुविधा केंद्रे असे म्हटले आहे. कारण ग्रंथालयांद्वारे विद्यार्थ्यांच्या बौध्दिक आणि मानसिक क्षमतांचे संवर्धन करण्याचा प्रयत्न केला जातो.

ग्रंथालयांच्या आर्थिक व्यवस्थापन आणि मनुष्यबळ विकासाच्या समस्या सोडविण्यासाठी आंतरविद्याशाखीय दृष्टीने अभ्यास होणे गरजेचे आहे असे वाटते. त्यामध्ये ग्रंथालयशास्त्र, अर्थशास्त्र आणि व्यवस्थापन शास्त्र या तीन विद्याशाखा अभ्यासणे आवश्यक आहे. त्यामुळे अशा केलेल्या अभ्यासाला उपयोजित दृष्टीने महत्व प्राप्त होईल. अशा पध्दतीने विचार केल्यास महाराष्ट्रातील महाविद्यालयीन ग्रंथालयांचा दर्जा सुधारण्यासाठी निश्चितच उपयोग होईल असे वाटते.

महाविद्यालयीन ग्रंथालये ही ज्ञान, विज्ञान आणि संस्कृती संवर्धनाचे कार्य प्रभावीपणे करत आहेत. परंतु त्यांचे स्वरुप व कार्य हे प्रदेश निहाय भिन्न स्वरुपाचे असल्याचे दिसून येते. महाराष्ट्रातील पश्चिम महाराष्ट्र, कोकण, विदर्भ,



Scanned with OKEN Scanner

मराठवाडा आणि उत्तर महाराष्ट्र असे प्रदेश आपण मानतो. या सर्व विभागीय प्रदेशातील असलेल्या महाविद्यालयातील ग्रंथालये ही भिन्न अवस्थेतून जात आहेत.

यातील नमुना म्हणून आपण दोनच विभागीय प्रदेशांचा तुलनात्मक विचार केला तर तेथील महाविद्यालयीन ग्रंथालयांच्या विकासाच्या गतीतील तफावत जाणवते. मराठवाडा आणि त्याचे जवळील उत्तर महाराष्ट्रातील असलेली महाविद्यालयीन ग्रंथालये ही भिन्न अवस्थेतून जातांना दिसतात.

मराठवाडयात औरंगाबाद, जालना, बीड, उस्मानाबाद, लातुर, नांदेड, हिंगोली, परभणी जिल्हयांतील महाविद्यालये आणि उत्तर महाराष्ट्रातील अहमदनगर, नाशिक, धुळे, जळगांव, नंदुरबार या जिल्हयातील महाविद्यालयीन ग्रंथालये वेगवेगळया स्थितीत असल्याचे जाणवते. अगदी या विभागातील प्रमुख दोन विद्यापीठांचा जरी विचार केला तर आपल्याला असे लक्षात येते की, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीटाची स्थापना १९५८ साली झाली तर सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ १९४८ साली स्थापन झाले. या प्रत्येक जिल्हयांच्या ठिकाणी तसेच तालुका पातळीपर्यंत महाविद्यालये स्थापन करण्यात आली. तेथे महाविद्यालयीन ग्रंथालयेही स्थापन झाली.

मराठवाडा प्रदेश १७२९ ते १९४८ या काळात निझामी अंमलाखाली होता. त्यामुळे या प्रदेशात अज्ञान, दारिद्रय व मागासलेपण वाढत गेले. शिक्षणाचा प्रसार गोगलगायीच्या गतीने झाला. सामाजिक व आर्थिक मागासलेपणामुळे या प्रदेशात १९५७ पर्यंत अंधारच होता. १९५८ साली मराठवाडा विद्यापीटाची स्थापना झाली व या प्रदेशात उच्च शिक्षणासाठी महाविद्यालये स्थापन होऊ लागली. ही ज्ञानक्रांती या प्रदेशाचे चित्र बदलण्यासाठी पूरक व पोषक टरली. त्यातून महाविद्यालयीन ग्रंथालयांचा विकास झाला.

उत्तर महाराष्ट्र पेशवाईच्या अस्तानंतर १८१८ साली ब्रिटीश अंमलाखाली आला. ब्रिटीशांनी या प्रदेशात उदार शिक्षणाला प्रारंभ केला. त्यामुळे मराठवाडा प्रदेशाच्या तुलनेत या प्रदेशात महाविद्यालये १०० वर्षे आधी सुरु झाली. पुण्यामध्ये लोकमान्य टिळक व गोपाळ गणेश आगरकर यांनी फर्ग्युसन कॉलेज स्थापन केले. पुढे स्वातंत्र्यानंतर जिल्हा व तालुका पातळीपर्यंत महाविद्यालये स्थापन झाली. १९७० नंतर शिक्षणाचे विकेंद्रीकरण होऊन ग्रामीण महाविद्यालये स्थापन झाली. या सर्व महाविद्यालयांमध्ये ग्रंथालये स्थापन झाली. अगदी नमुना दाखल घेतलेल्या या दोन विभागातील महाविद्यालयीन ग्रंथालयांच्या आर्थिक व्यवस्थापन व मनुष्यबळ विकास समस्या लक्षात घेतल्यास त्यात नाविण्यता दिसते. ती अशी -

उत्तर महाराष्ट्रात महाराष्ट्र ब्रिटीश अंमलाखाली तर मराठवाडा निजामी राजवटीत होता. त्यामुळे मराठवाडा प्रदेशामध्ये शिक्षणाचा अनुशेष वाढत गेला. निजामांचे धोरण शिक्षण, ग्रंथालये व साहित्याच्या प्रसारास अनुरुप नव्हते. ते अभिव्यक्ती स्वातंत्र्याची गळचेपी करणारे होते. निजामी राजवटीत वृत्तपत्रे, ग्रंथालये आणि समाजप्रबोधनाच्या साधनांच्या प्रसारावर कडक निर्बंध होते. या सर्व कारणांमुळे आज देखील मराठवाडयातील ग्रंथालयांच्या आर्थिक व्यवस्थापन व मनुष्यबळ विकासाच्या समस्यांमध्ये भरच पडत गेल्याचे दिसते. तुलनेने उत्तर महाराष्ट्रात तसा प्रभाव जाणवत नाही.

तसे पाहिले तर आज बहुतेक महाविद्यालयीन ग्रंथालये ही आर्थिक अडचणीत सापडली आहेत. त्यांना यु.जी.सी.चे अनुदान तुटपुंजे असते. व ते उशिराने मिळते. विशिष्ट कालावधीत ही रक्कम खर्च केली नाही तर ती परत जाण्याचा धोका असतो. विनाअनुदानित खाजगी महाविद्यालयांना तर येणाऱ्या विद्यार्थ्यांच्या फी वसुलीवरच ग्रंथालयांचे आर्थिक प्रश्न सोडवायचे असतात. अशा या संकटांतून महाविद्यालयीन ग्रंथालयांना मुक्त करण्यासाठी या समस्येचे निदान करण्याची आवश्यकता आहे.

महाविद्यालयीन ग्रंथालयांमध्ये व्यवस्थापनाचा अभाव आहे, त्यामुळे साधनसामुग्रीचा अपव्यय होतो. तो टाळण्यासाठी व्यवस्थापन शास्त्राच्या दृष्टीने देखील विचार करुन या समस्येवर मात करण्याची गरज वाटते. उपलब्ध साधनसामुग्रीचे अधिक चांगले व काटेकोर नियोजन करण्याची आवश्यकता वाटते.

ग्रंथालयांमध्ये आवश्यक मनुष्यबळाचा विकास करण्याकडे दुर्लक्ष होत आहे. मुळात ग्रंथालयांची परिस्थिती पाहता आवश्यक तेवढे मनुष्यबळ अनुदानित व खाजगी विनाअनुदानित महाविद्यालयांमध्ये उपलब्ध होत नसल्याने ग्रंथालयांचा विकास हवा त्या गतीने होत नसल्याचे दिसते.

सध्या ग्रंथपालांना अॅकेडेमीक स्टाफ कॉलेजमध्ये प्रशिक्षणाशिवाय अन्य पर्याय नाही. हे प्रशिक्षण वर्ग दोन तीन वर्षांतून एकदा होतात व त्यात संधी मिळणे कटीण होते. त्यामुळे नवीन प्रशिक्षण सुविधा निर्माण करणे आवश्यक आहे असे वाटते.



Scanned with OKEN Scanner

अलिकडे संगणक आणि माहिती तंत्रज्ञानाचा वापर केला जात आहे. त्यामुळे ग्रंथलयांच्या कार्यप्रणालीत बदल होत आहे. अलिकडे बारकोडींग मुळे ग्रंथांचा विनिमय शास्त्रीय पध्दतीने होत आहे. तसेच ग्रंथ हरवणे, चुकीच्या ठिकाणी ग्रंथ जाणे (मिसप्लेस) या सारख्या समस्या उद्भवणार नाहीत. तथापि, प्रगत माहिती तंत्रज्ञानाकडे संक्रमण करण्यास अनेक अडचणी आहेत. त्या समस्या कशा सोडविता येतील आणि ग्रंथालयांचा विकास कसा करता येईल याचा विचार होणे आवश्यक वाटते. वर नमुद केलेल्या ग्रंथालयांच्या आर्थिक व्यवस्थापन व मनुष्यबळ विकासाच्या समस्यांचे निराकरण झाले तर महाविद्यालयांच्या ग्रंथालयांचा दर्जा उंचाविण्यासाठी मदत होईल असे वाटते.

थोडक्यात - अनुदानित आणि विनाअनुदानित महाविद्यालयांची अर्थव्यवस्था सुधारली पाहिजे तरच त्यांचे प्रश्न सुटतील. अनुदान कसे मिळवावे, ते खर्च कसे करावे याचाही विचार म्हणजे आर्थिक व्यवस्थापन या ग्रंथालयांच्या विकासासाठी महत्वाचे आहे. महाविद्यालयातील मनुष्यबळाचा प्रश्न सोडविण्यासाठी सध्या असलेले ग्रंथपाल, सहाय्यक ग्रंथपाल, त्यांचे मदतनीस यांच्यासाठी प्रशिक्षण सुविधा अपुऱ्या आहेत. विद्याप्रबोधिनीच्या पलीकडे जाऊन काही नव्या सुविधा निर्माण केल्या तर मनुष्यबळ विकासाच्या समस्या सोडविण्याच्या दृष्टीने निश्चितच फायदा होईल.

समाजशास्त्रीय दृष्टीने विचार केला तर असे म्हणता येईल की, सभोवतीचे सामाजिक व आर्थिक बदल महाविद्यालयास व ग्रंथालयास बदलण्यासाठी भाग पाडत आहेत. अलिकडे कम्युनिटी कॉलेज ही संकल्पना उदयास येत आहे. ग्रंथालये जनतेसाठी खुली करावयाची झाल्यास त्यांची कार्यपध्दती बदलावी लागेल. वाचकांना इंटरनेट द्वारे अधिक सुविधा दयाव्या लागतील.

स्पर्धा परिक्षांना बसणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. राज्य व केंद्रिय लोकसेवा आयोगाच्या स्पर्धा परिक्षांना लागणारे संदर्भ साहित्य आणि पुस्तके याचा संग्रह कसा करावा व विद्यार्थ्यांना अद्यावत ज्ञान कसे द्यावे याबाबत मार्गदर्शन करण्यासाठी देखील महाविद्यालयीन ग्रंथालयांचे प्रश्न सोडविण्यासाठी प्रयत्न झाले पाहिजे.

ग्रंथालयांच्या आर्थिक व्यवस्थापन आणि मनुष्यबळ विकासाच्या समस्या सोडविण्याच्या दृष्टीने महाविद्यालयीन ग्रंथालयांच्या आर्थिक व्यवस्थापनाचा शास्त्रीय अभ्यास होणे गरजेचे आहे. या ग्रंथालयांच्या विकासासाठी प्राप्त झालेल्या अनुदानाचा अभ्यास झाला पाहिजे. त्या ग्रंथालयांवर होणाऱ्या खर्चाचा देखील अभ्यास केला गेला पाहिजे. या ग्रंथालयांच्या लाभधारकांचा आर्थिक व सामाजिक दृष्टीने अभ्यास झाला पाहिजे. आर्थिक व्यवस्थापनाप्रमाणेच ग्रंथालयातील मनुष्यबळ विकास समस्या सोडविणे देखील महत्वाचे आहे. प्रगत माहिती तंत्रज्ञानाचा वापर करुन या समस्यांवर महाविद्यालये कशी मात करु शकतात हे देखील अवलंबुन आहे.

पिटर ड्रकर यांनी ' प्रॅक्टीस ऑफ मॅनेजमेंट ' हा ग्रंथ लिहीला आहे. या ग्रंथात त्यांनी आधुनिक व्यवस्थापनातील व्यवहार पध्दतीवर प्रकाश टाकला आहे व नव्या जगात व्यवस्थापन कसे बदलत आहे त्याबाबत विवेचन केले आहे. या ग्रंथात मनुष्यबळ विकासावर सुध्दा एक स्वतंत्र प्रकरण आहे. त्यांनी म्हटले आहे, "आधुनिक काळात एखादा व्यवसाय असो, संस्था असो की एखादी संघटना असो त्यातील व्यवस्थापनाला सामाजिक बांधिलकीच्या भावनेने काम करावे लागते." (पृ.२६१)

लियान हॅंडरसन यांनी 'ह्युमन रिसोर्स मॅनेजमेंट ' हा ग्रंथ लिहीला आहे. या ग्रंथामध्ये त्यांनी मनुष्यबळ विकासाच्या संकल्पनेची व्यवस्थापन दृष्टीने आकलन केले आहे. त्यामध्ये त्यांनी म्हटले आहे, "संस्थापक विकास कार्यात मनुष्यबळाचा विकास केल्यास त्याचे अनेक लाभ होतात. सेवांची गुणवत्ता व दर्जा यांत सुधारणा होते. " (पृ.८)

'ह्युमन रिसोर्स मॅनेजमेंट' या विकास अरोरा व सिमा अरोरा यांनी लिहीलेल्या ग्रंथात त्यांनी मनुष्यबळ विकासाची तत्वे व उपाययोजना यावर प्रकाश टाकलेला आहे. तसेच काही संस्थांची व्यष्टी अध्ययने दिली आहेत. "अलिकडे प्रत्यक्ष कार्यातील अनुरुप गुणवत्ता वाढविण्यासाठी मनुष्यबळाचा विकास होत आहे" (पृ.४५१) यावर त्यांनी भर दिला आहे. अशा संकल्पनांचा महाविद्यालयांच्या ग्रंथालयांसाठी उपयोग होऊ शकतो.

'इंडियन इकॉनॉमी' या दत्त रुदर यांनी लिहीलेल्या ग्रंथात भारतीय अर्थव्यवस्थेच्या विविध पैलुंचे दर्शन घडविले आहे. त्यामध्ये कल्याणाचे अर्थशास्त्र या विषयावर एक स्वतंत्र प्रकरण आहे. ग्रंथालयाद्वारे होणारे मानवी कल्याण अभ्यासण्यासाठी हा ग्रंथ उपयुक्त आहे.

ग्रंथालयांच्या आर्थिक व्यवस्थापन आणि मनुष्यबळ विकासाच्या समस्या शोधतांना त्यामागे काही कारणे असल्यामुळे या प्रक्रियेत कार्यकारण भाव शोधणे हे अगत्याचे ठरते.



Scanned with OKEN Scanner

**E-ISSN : 2348-7143**
**Oct-Dec 2021**

**संदर्भ ग्रंथ :-**

१. वाघमारे बी.एस. (२०१४), मनुष्यबळ विकास, एज्युकेशनल बुक्स, औरंगाबाद.
२. नाईक नंदकुमार (२००५), लोकप्रशासन आणि व्यवस्थापन, विद्या बुक्स, औरंगाबाद.
३. पवार एस.पी. (१९८२), ग्रंथालय व माहितीशास्त्र, फडके प्रकाशन, कोल्हापूर.
४. भागवत शशिकला, ग्रंथालय व्यवस्थापन, युनिव्हर्सल प्रकाशन, पुणे.
५. कुंभार राजेंद्र, ग्रंथालय आणि माहितीशास्त्र संशोधन, युनिव्हर्सल प्रकाशन, पुणे.
६. टक्कर के.एच., अर्थशास्त्राची मूलतत्वे, किर्ती प्रकाशन, कोल्हापूर.
7. Girija Kumar, (1993) Library Development in India, Vikas Publishing House, Delhi.
8. Arora Vikas & Arora Seema, (2011), Human Resource Management, Global Vision Publishing House, New Delhi.
9. Drucker Peter F. (2004), The Practice of Management, Butterworth - Heinemann, Oxford.
10. Sharma J.S. (1978), Library Organisation, Vikas Publishing House, New Delhi.
11. Mahajan S.G. (1989), Library Development In Maharashtra, in the souvenir Published at the time of All India Library Conference, Pune.
12. Datt Ruddar, (2004), Indian Economy, S.Chand & Co., New Delhi.



Scanned with OKEN Scanner